FT चारोळी

अचानक पाऊस आल्यावर
काही थेंब तुझ्या ओठांवर थांबले...
मग क्षणभर मी पाहतच राहिलो
आणि आयुष्यात पहिल्यांदा मला थेंब व्हावेसे वाटले...
– मंगेश खरात

FT एसएमएस

Luck is not in ur hands, But decision is in ur hands...
"Ur decision can make luck, But Luck can never make ur decision .. "So always trust urself..."

FT नेट लावून

खरंच...?

- इंडियानामधील एका माकडावर सिगारेट ओढल्याबद्दल खटला चालविण्यात आला होता!
- माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याच्या शरीरात ३०० हाडं असतात; पण तारुण्यावस्थेत येईपर्यंत त्याच्या अंगात फक्त २०६ हाडं शिल्लक राहतात. याचं कारण असं की बरीच दुहेरी हाडं नंतर एकत्र येऊन एकच हाड बनतं!
- कागदाच्या कुठल्याही तुकड्याची ७ पेक्षा अधिक वेळा घडी घालता येत नाही.

- अमेरिकेत २०० पेक्षा अधिक जातीची कलिंगडं पिकवली जातात.
- लिओनार्दो दा विन्सी याने मोनालिसा या त्याच्या प्रसिद्ध चित्रावर सही केलेली नाही!



- सर्वात लहान ख्रिस्ती धर्मगुरू ११ वर्षांचे होते.
- हृदयाच्या विशिष्ट जागेमुळे माणसाचे उजवे फुफ्फुस डाव्यापेक्षा मोठे असते.
- डासांना दात असतात.
- २ वर्षांचा होईपर्यंत सिंह डरकाळी फोडू शकत नाही.
- प्रत्येक खंडात रोम नावाचे शहर आहे.
- शिंपला त्याचे लिंग बदलू शकतो.
- लाकडाचे ७० वेगवेगळे तुकडे एकत्र करून एक व्हायोलिन बनते!
- मुंग्या कधीच झोपत नाहीत.
- शार्क मासे पृथ्वीवर गेल्या ४ अब्ज वर्षांपासून वास्तव्य करून आहेत.
- दिव्याचा शोध लावणारा थॉमस एडिसन हा अंधाराला घाबरायचा.

साहसी कयाकर...

मोठमोठे पर्वत, मोठमोठ्या नद्या आणि मोठ्या मनाच्या लोकांचा छोटासा देश म्हणजे नेपाळ. या देशातील महाकाय नद्या आपल्याकडच्या 'संथ वाहते कृष्णामाई'सारख्या तर मुळीच नाहीत. खळाळत्या वाहणाऱ्या नद्यांवर बोटिंग करणे सोपे नाही. येथील धबधबे साहसवीरांची कसोटी पाहणारेच. उप्पर सेटी घाटीतून बोटिंग करणे तर भयंकर साहस मानले जाते! तरीही कनोइंग-कयाकिंग, तसेच साहसी बोटिंगची मजा लुटणाऱ्यांची संख्या नेपाळमध्ये कमी नाही. विविध देशांतील साहसी कयाकर या घाटीतून बोटिंग करणे प्रतिष्ठेचे मानतात. उप्पर सेटी घाटीतील प्रचंड वेगाने कोसळणाऱ्या धबधब्यावरून बोट वल्हविणाऱ्या या साहसवीर कयाकरचे टिपलेले हे अप्रतिम छायाचित्र. हा साहसवीर कयाकर आहे चित्रपट निर्माता जोश नील्सन. 'नॅशनल जिओग्राफिक'च्या यंदाच्या मेच्या पहिल्या आठवड्यातील हे सर्वोत्कृष्ट छायाचित्र ठरले आहे.

FT नवा चित्रपट : पांगिरा

संतोष शाळिग्राम

शेतकऱ्याच्या 'ओसाड' जीवनाची शोकांतिका

कोट्यवधी लोकांचा पोशिंदा म्हणजे शेतकरी. पण कोर्टकचेऱ्या, भाऊबंदकी, हेवेदावे, राजकारण्यांच्या हातातलं बाहुलं होणं, त्यांच्या डावपेचांवर एकानं स्वार व्हायचं आणि दुसऱ्याच्या जिवावर घाव घालायचा, ही त्याच्या आयुष्याची एक बाजू आहे. असं शापित जिणं त्यांच्या नशीबी का येतं, या प्रश्नाचं उत्तर काही मिळत नाही. दिग्दर्शक राजीव पाटील यांनी 'पांगिरा'तून हे भेदक वास्तव पडद्यावर आणलंय.

'पांगिरा' हा मातीला माय मानणाऱ्या शेतकऱ्याचे जीवन आहे. या चित्रपटातील प्रत्येक प्रसंग शहरी वातावरणात वाढलेल्या प्रेक्षकांना कदाचित अतिशयोक्ती वाटू शकेल; पण ते वास्तव आहे. एक इंच बांध कोरला म्हणून एकमेकांची जिवावर उठलेला शेतकरी आजही ग्रामीण भागात पाहायला मिळतो. कारण माती (शेतजमीन) हे त्याचं सर्वस्व असतं. त्याची राखण तो पोटच्या पोरासारखी करतो. भाऊबंदकीचा फेरा मात्र त्याला चुकत नाही. या फेऱ्यात स्वत:ला वरचढ ठरविण्यासाठी हा पोशिंदा वाट्टेल ते करतो. प्रसंगी जमिनीचा डाव लावतो; कधी भावाचा जीव घेतो, हे वास्तव 'पांगिरा' दाखवतो.

'पांगिरा' हे डोंगराच्या कुशीत वसलेले एक गाव आहे. सोकाजीराव देशमुख (किशोर कदम) या सरपंचाच्या विळख्यात ते अडकलेलं आहे. आमदाराचा (उपेंद्र लिमये) वरदहस्त मिळवून गावाला नागविण्याचा धंदा तो अव्याहतपणे करत असतो. मुरारपाटील हा गावातील आदरणीय बुजुर्ग. गावाला वाचविण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. अशातच गावातील मातीचा अभ्यास करण्यासाठी एक विद्यार्थिनी येते. पीक व्यवस्थापनाचे नवे तंत्र ती गावाला देऊ पाहते. गावकीचं राजकारण मात्र तिचे प्रयत्न यशस्वी होऊ देत नाही. यातून गटबाजी, कटकारस्थाने, सहकारी बँकेचे आर्थिक गैरव्यवहार तिच्या लक्षात येतात; पण ती हतबल असते. पांगिरा हा आमदाराचा मतदारसंघ असल्याने मतदारांच्या जमिनी ओल्या करण्यासाठी तो बंधारा मंजूर करून आणतो. त्यासाठी पांगिराच्या वरच्या बाजूची वाडी निवडली जाते. तिथल्या नागरिकांना विस्थापनाची चाहूल लागते. यातून संघर्षाचा आगडोंब उठतो. यातून तावूनसुलाखून निघालेली दोन्ही गावे गुण्यागोविंदाने नव्याने उभारी घेतात. ते सुखाचं गाणं गात असतानाच पिक विक्रीच्या बाजारात त्यांचं दुर्दैव पुन्हा डोकं वर काढतं...

(प्रस्थापित वगळता) बहुतांश शेतकऱ्यांच्या 'ओसाड' जीवनाची शोकांतिका असं 'पांगिरा'चं वर्णन करता येईल. पांगिरा कांदबरीला चित्रपटासाठी पटकथेत बसविणाऱ्या संजय आणि राजीव पाटील

यांना विशेष दाद द्यावी लागेल. कादंबरीचा विस्तार लक्षात घेता, चित्रपट पाल्हाळिक झालेला नाही, हे त्यांच्या पटकथेचं यश आहे.

चित्रपटाची मांडणी उत्तम आहे; पण पूर्वार्धात बराच वेळ गावाची ओळख करून देण्यात गेलाय. त्यामुळे प्रेक्षक उशिरा कथेशी एकरूप होतो. या शिवाय संवादात सरकारी तांत्रिक शब्द खटकतात. उत्तरार्ध मात्र हेलावून टाकतो. शेवट शोकात्म असला, तरी टोकदार झालाय. अभिनय हे या चित्रपटाचे बलस्थान आहे. प्रत्येक कलाकार शेतकऱ्याचं जिणं जगलाय. विजय नारायण यांनी संगीतबद्ध केलेली 'घाव पडला पाण्यापायी' आणि 'दिस अल्हाद पळंल, जग नव्यानं कळंल' ही दोन गाणी प्रसंगांना प्रभावी करतात. बदलत्या गावपंढरीची ही कहाणी एकदा तरी अनुभवाच!

FT वेब वाटा

महेश पठाडे

सत्य, अहिंसा, शाकाहाराचा संदेश देणाऱ्या जैन समाजाचा आरसा

wwww.herenow४u.net.

'नमो अरिहंतानम्। नमो सिद्धानम्।...' या नवकार मंत्राने सामावलेला, सत्य, अहिंसा आणि शांतीचा संदेश देणारा जैन धर्म आता जगभरात एका क्लिकसरशी पसरला आहे. त्याचे फॉलोअर्स जैन धर्मीयच नाही, तर अन्य धर्मीयही या धर्माची तत्त्वे अभ्यासत आहेत, अंगीकारत आहेत. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे wwww.herenow४u.net.

ज्यांना जैन धर्म जाणून घ्यायचा आहे, त्यांनी या संकेतस्थळाला आवर्जून भेट द्यायला हवी. विशेष म्हणजे या संकेतस्थळाचे संपादक जर्मनीतील करुणा जैन व अपरिग्रह जैन आहेत. हे दाम्पत्य मूळचे जर्मनीतील असून, जैन धर्मातील विचार आवडल्यानंतर त्यांनी जैन धर्म स्वीकारला. आता त्यांनी या संकेतस्थळाच्या माध्यमातून जैन धर्माची तत्त्वे जगभर खुली केली आहेत. जैन तत्त्वे, जैन विज्ञान, शाकाहारासह अनेक विषयांवर लेख, तसेच जगभरातील साधू- साध्वींची माहिती, जैन मंदिरे आदी इत्थंभूत माहिती संकेतस्थळावर आहे. जैन धर्मातील सर्वच पंथांना न्याय देण्याचा प्रयत्न या संकेतस्थळाने केला आहे. केवळ माहितीचा साठाच नाही, तर जैन समाजातील महत्त्वाच्या घडामोडींचीही अपडेट या संकेतस्थळाने देण्याचा प्रयत्न केला आहे. जैन मुनींची प्रवचने, त्यांची छायाचित्रे, तसेच राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, तसेच माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांनीही जैन समाजाला दिलेल्या भेटीप्रसंगी केलेली भाषणे व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून येथे पाहायला मिळतात. जैन मुनींच्या प्रवचन, चातुर्मास आदींवरही व्हिडिओ क्लिप उपलब्ध असल्याने जगभरातील कार्यक्रम एका क्लिकवर घरबसल्या पाहण्याची व्यवस्था या संकेतस्थळाने उपलब्ध करून दिली आहे. सत्य, अहिंसा आणि शाकाहाराचे महत्त्व पटवून सांगणारा जैन समाज जाणून घेण्यासाठी अन्य धर्मीयांना, अभ्यासकांना हे संकेतस्थळ म्हणजे एक माहितीचा साठा ठरेल यात शंका नाही.

कोण होता जेरोनिमो...?

पाकिस्तानमधील अबोटाबादमध्ये अमेरिकन नेव्हीचे 'सील्स' कमांडो आपले सावज टिपण्याच्या तयारीत असतानाच तिकडे वॉशिंग्टनमधील 'सिच्युएशन रूम'मध्ये सहकाऱ्यांसह बसलेले अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा समोरच्या व्हिडिओ स्क्रीनवरून एक सेकंदही नजर हटविण्यास तयार नव्हते. अखेर 'सिच्युएशन रूम'मधला 'पिन ड्रॉप सायलेन्स' तोडत गुप्तचर विभागाचे (सीआयए) संचालक लिओन पेनेट्टा यांनी 'जेरोनिमो इका' अशी घोषणा केली अन् ओबामांच्या चेहऱ्यावर लांबरुंद हास्य पसरले. ही वर्दी होती, नंबर एकचा शत्रू ओसामा बिन लादेनचा खातमा केल्याची. ठरल्यानुसार 'सील' कमांडोंच्या या ऑपरेशनला 'जेरोनिमो' असे नाव देण्यात आले होते; मात्र, या ऑपरेशनच्या यशस्वितेची वर्दी वॉशिंग्टनपर्यंत पोचविताना 'जेरोनिमो इका' असा सांकेतिक शब्द वापरला गेला. महत्त्वाच्या कामगिरीसाठी लष्कर, तसेच पोलिसांकडून नेहमीच अशा प्रकारच्या सांकेतिक शब्दांचा वापर केला जातो. अशा प्रकारे वापरल्या जाणाऱ्या सांकेतिक शब्दांमागे मोठा इतिहासही लपलेला असतो. 'जेरोनिमो इका' या शब्दामागेही असाच इतिहास आहे. 'इका' म्हणजे 'एनिमी किल्ड इन ॲक्शन', तर जेरोनिमो हे मूळ अमेरिकन आपाचे जमातीतील आदिवासींच्या म्होरक्याचे नाव. अठराव्या शतकाच्या अखेरीस जेरोनिमो जगाला माहीत झाला, तोच एक लढवय्या म्हणून. १८२९ मध्ये ॲरिझोना प्रांतात गिला नदीच्या काठी जन्मलेला जेरोनिमो मूळ अमेरिकन आदिवासींच्या हक्कासाठी शेवटपर्यंत लढला. ॲरिझोना, न्यू मेक्सिको व पश्चिम टेक्सास प्रांतातला मोठा भूभाग या आदिवासींच्या ताब्यातून सोडवण्यासाठी त्या वेळी मेक्सिकन व अमेरिकी फौजा झगडत होत्या. १८५८ मध्ये अशाच एका समर प्रसंगात मेक्सिकन सैन्याच्या गोळीबारात मोठ्या प्रमाणावर आदिवासी मारले गेले. त्यात जेरोनिमोच्या भल्यामोठ्या कुटुंबातील अनेक सदस्यांबरोबरच त्याची पत्नी, चार मुले व आईचा समावेश होता.

यावर चिडलेल्या जेरोनिमोने या हत्याकांडाचा बदला घेण्याच्या उद्देशातून मूळ अमेरिकनांचा मोठा गट स्थापन केला व मेक्सिकन, अमेरिकन सैन्यावर एका पाठोपाठ एक हल्ले सुरू केले. मूळ अमेरिकनांच्या वसाहतींचा विस्तार वाढविणे, हा आपाच्यांच्या संघर्षाचा मुख्य उद्देश होता. त्याच्या कारवायांनी अमेरिका चांगलीच हैराण झाली होती. त्या वेळी जेरोनिमोस जिवंत अथवा मृत पकडण्याचा विडाच उचलण्यात आला होता. मात्र, अमेरिका व मेक्सिकोच्या सीमावर्ती भागातील जनतेवर त्याच्या लढवय्या वृत्तीने गारूड केले होते. त्या जोरावर जवळ जवळ दोन दशके जेरोनिमोने अमेरिकन सैन्याला हुलकावणी दिली.

शेवटी ४ सप्टेंबर १८८६ रोजी त्याने आपल्या सहकाऱ्यांसह फर्स्ट लेफ्टनंट चार्ल्स गेटवूड यांच्या तुकडीसमोर शरणागती पत्करली. गेटवूड हे जेरोनिमो व त्याच्या जमातीला चांगल्या प्रकारे ओळखतात, अशी माहिती मिळाल्यानंतर जनरल नेल्सन मिल्स यांनी जेरोनिमोला पकडण्याची जबाबदारी गेटवूड

जेरोनिमो

यांच्यावर टाकली. गेटवूड यांनीही जबाबदारी ओळखून जेरोनिमोला शरणागती पत्करण्यास तयार केले. अमेरिकन लष्कर व प्रशासनाला शरणागतीची ही बाब रुचली नाही. त्यांनी त्याला पकडल्याचे जगाला ओरडून सांगितले. पुढे युद्धकैदी म्हणून त्याला व त्याच्या साथीदारांना जवळ जवळ वीस वर्षे फ्लोरिडा, अलाबामा येथे अंधारकोठडीत ठेवण्यात आले. या कालावधीत बाहेरच्या जगात आपल्या बांधवांच्या हक्कासाठी लढणारा लढवय्या म्हणून त्याची कीर्ती पसरली. १९०५ मध्ये जेरोनिमोने आपली खडतर जीवन कहाणी एस. एम. बारेट्टी या शिक्षण अधिकाऱ्याला ऐकविली. त्यावर बारेट्टीने पुस्तकही लिहिले; मात्र या पुस्तकाची ओळ न् ओळ तपासण्याचे आदेश अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष थिओडोर रुझवेल्ट यांनी दिले होते. सरतेशेवटी त्याने शिक्षा माफ करण्याची मागणी केल्यानंतर त्याची तुरुंगातून सुटका करण्यात आली. मात्र, त्याला जन्मभूमी ॲरिझोनामध्ये प्रवेश करण्यास बंदी घालण्यात आली होती.

१९०९ मध्ये ओकाहोमा येथील तो राहत असलेल्या 'सील' किल्ल्यावर त्याचा घोड्यावरून पडून मृत्यू झाला. तेथे आजही त्याची समाधी आहे. जेरोनिमोला अध्यात्माची ओढ होती. तसेच अंगभूत युद्धकौशल्यामुळे त्याने स्वतःला योद्धा म्हणून प्रस्थापित केले होते. तो लादेनप्रमाणे कट्टर मूलतत्त्ववादी कधीच नव्हता. त्याने निष्पाप लोकांवर कधीच हत्यार चालवले नाही. मूळ अमेरिकन अपाचे जमातीच्या अस्तिवासाठी लढणारा हिरो म्हणूनच त्याची ख्याती होती. हॉलिवूडमध्ये त्याच्या जीवनावर बनविण्यात आलेल्या चित्रपटात व्हेस स्टुडी याने 'जेरोनिमो'ही शीर्षक भूमिका केली आहे. त्यामुळेच लादेनसारख्या क्रूरकर्म्याचा खातमा करण्यासाठी राबविलेल्या कारवाईशी त्याचे नाव जोडले गेल्याने अनेक अमेरिकन नागरिकांनाही धक्का बसला. अपाचे जमातीच्या संघटनेचे प्रमुख जेफ हॉसेर यांनी अध्यक्ष बराक ओबामा यांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली असून, 'लोकांच्या भल्यासाठी संघर्ष दिलेल्या योद्ध्याचे नाव जगाने हेटाळणी केलेल्या माणसाशी कशासाठी जोडले,' अशी विचारणा करून थेट माफीची मागणी केली आहे. यावर अध्यक्ष बराक ओबामा कसा प्रतिसाद देतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

ओकाहोमा येथील 'सील' किल्ल्यावरील जेरोनिमोची समाधी.

संजय नलावडे
sanjay.nalawade@esakal.com

naaptol.com हॉटडील्स नापतोल
ऑर्डर करा 24 x 7 0922 358 4000
होम डिलीव्हरी । 58888 वर naaptol एसएमएस करा । naaptol.com/hot ला भेट द्या
102 पीसेस् मल्टिपर्पज टूल किट
शक्तिशाली ड्रिल मशीन सहित
₹5995 ₹2499
वाचवा 58%
डील कोड : 864
450 W REAL POWER

• नो लोड स्पीड 2200rpm • कमाल ड्रिलिंग व्यास 13mm
पॅकेजमध्ये आहे :
102 पीसेस् मल्टिपर्पज टूल किट, शक्तिशाली ड्रिल मशीन, 100+ ड्रिलिंग ॲक्सेसरीज्सह
6 महिन्यांची वॉरंटी*
शिपिंग ₹299/- अतिरिक्त*
उत्पादने व वॉरंटी ३-या पक्ष विक्रेत्यांद्वारे. ब्रॅण्ड्स, लोगो, क्रिएटीव्ह, ट्रेडमार्क, कॉपीराईट या बाबी संबंधित उत्पादकांच्या मालकीच्या आहेत.
अटी लागू* तक्रारी साठी 09223516148 वर कॉल करा (सकाळी 7 ते रात्री 10), चौकशी/कॉर्पोरेट/ मोठ्या प्रमाणावरील ऑर्डर्स साठी contact@naaptol.com वर इ-मेल करा तुमचा एरिया पिन कोड तयार ठेवा/डिलीवरी मिळाल्यावर रोख